# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र. 227/2023  दिनांक : 11.06.2023

## 1)जबरी चोरी :–

**किनवट** :–दिनांक 10.06.2023 रोजी 09.45 वा. चे सुमारास, **बी.पी. कॉलेजचे पाठीमागील पटांगणात गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील दोन अज्ञात इसम नाव गाव माहित नाही त्यातील एकाने पांढऱ्या रंगाचे शर्ट घातलेले व लांब केसाचा आणि दुसरा काळा टी–शर्ट घातलेला सावळया रंगाचा यांनी संगणमत करून फिर्यादी यांचे स्टॉपचा वैभव सुधाकर रोडगे याच्या जवळील एक लाख पंचवीस हजार रूपयाने भरलेली बॅग जबरीने हिसकावण्याचा प्रयत्न करून त्याचे जांगेला कोणत्यातरी हत्याराचा वापर करून दुखापत केली. वगैरे **फिर्यादी अवधूत किशन पूयड, वय 25 वर्षे, व्यवसाय नौकरी स्पंदना फायनान्स शाखा व्यवस्थापक रा. वायपना बु. ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 151/2023 कलम 394,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सावंत, मो.क्रं. 9856935555** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**धर्माबाद** :– दिनांक 10.06.2023 रोजी 04.00 वा. ते सायंकाळी 07.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे रेल्वे क्कॉटर नंबर बी 16 रेल्वे कॉलनी धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा क्कॉर्टर ला स्वयंपाक करण्यासाठी आला असता त्याचे घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून सोन्या चांदीचे दागीने एक जुना मोबाईल असा एकुण किंमती 51,300/–रूपयाचा ऐवज कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सागर मल खीचड, वय 27 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. रेल्वे कॉलनी क्कॉर्टर नं. 16 धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 128/2023 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री महाजन, मो.क्रं. 9370467775** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**विमानतळ** :–दिनांक 09.06.2023 रोजी 05.45 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर सुंदरनगर, नांदेड येथे,** यातील अनोळखी इसमाने फिर्यादीचे गळयातील तीन तोळयाचे गंठन किंमती 21,000/–रूपयाचे चोरून नेले आहे. वगैरे **फिर्यादी हेमलता परशुराम कुरा, वय 58 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. सुंदरनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 188/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2305 आवाड, मो.क्रं. 9823350121** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :–

**उमरी** :– दिनांक 08.06.2023 रोजी 22.00 वा. ते दिनांक 09.06.2023 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घराचे समोरून मौ. गोळेगाव ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो स्पेलंडर कंपनीची मो.सा. क्रमांक एमएच–26/बीएल–6396 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणा वरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी शिवकुमार मारूती भंडरवाड, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. गोळेगाव ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 146/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2354** गेडाम, मो. क्रं. **9421768528** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**किनवट** :–दिनांक 10.06.2023 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **बी.पी. कॉलेज गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून यातील फिर्यादी हे महाविद्यालयाचे पेपर चालू असल्याने आरोपीतांना परिसराचे बाहेर जाण्यास सांगितले असता त्याचा राग मनात धरून पेपर संपल्यानंतर यातील आरोपीतांनी हातात लोखंडी रॉड घेवून संगणमत करून फिर्यादीचे डोक्यात मारून गंभीर दुखापत केली व थापड बुक्याने मारहाण करून शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शिवदास प्रेमनाथ बोकडे, वय 50 वर्षे, व्यवसाय शिक्षक रा. कोठारी ता. किनवट जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 150/2023 कलम 326,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री वाठोरे, मो. नं. 9923282854** हे करीत आहेत.

## 6)फसवणुक :–

**वजिराबाद :–** सन 2000 पासुन ते सन 2023 पर्यंत, **लातुर व नांदेड येथे,** यातील नमुद नऊ व अज्ञात एक आरोपीतांनी मिळुन शासनाच्या भुकंपग्रस्त कोटयातुन ज्ञानोबा शिवाजी बोबडे यास शासकीय नौकरी मिळविण्याच्या व मिळवून देण्याच्या गैर उद्देशाने दत्तक पत्रक वगैरे खोटे बनावट दस्तऐवज तयार करून त्याचे आधारे भुकंपग्रस्त प्रमाणपत्र हस्तगत करून सदरचे भुकंपग्रस्त प्रमापत्र नांदेड पोलीस भरती प्रक्रियेमध्ये सादर करून शासनाची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री रामदास माणिकराव केंद्रे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुंरन 210/2023 कलम 420,468,471,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/श्रीमती गिरे मॅडम, मो.नं. 8411835657** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड